भारती विद्यापीठ पोलिस ठाणे पुणे शहर
दिनांक- १८/०८/२०१७

## -प्रेस नोट-

# गुंड राहुल तुपे याचे दोन साथीदार अग्निशस्त्रासह अटकेत

## भारती विदयापीठ पोलीसांची कारवाई

भारती विदयापीठ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील कर्मचारी यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कात्रज कोंढवा रोड गोकुळनगर खंडोबा मंदीरासमोरील गल्लीत दोन इसम थांबलेले असुन त्यांचेकडे देशी बनावटीचे पिस्टल असुन त्यांचेमधील एक इसम रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळालेबाबत तपास पथकाचे अधिकारी यांना कळविली असता त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांना कळविली असता त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिल्याने तपास पथकाचे प्रभारी अधिकारी व त्यांचे टिमने दिनांक १७/८/२०१७ रोजी रात्री २०.१० वा कात्रज कोंढवा रोड गोकुळनगर खंडोबा मंदीरासमोरील गल्लीत सापळा लावुन इसम नामे १). बाळा ऊर्फ आकाश मनोहर माकर वय.२३ वर्ष रा.३/८ बिनावत पार्क काळे पडळ हडपसर पुणे २) प्रसाद शिवाजी मोरे वय.२१ वर्ष रा.विघ्नहर्ता कॉलनी गोकुळनगर कात्रज कोंढवा रोड पुणे यांना पकडले असता अनु नं १ याचेकडे कि.रु ५५,६००/- एक देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुस तसेच अनु नं २ याचेकडे एक लोखंडी कोयता कि.रु ४००/- चा असा एकुण ५६,०००/- चा माल मिळुन आल्याने त्यांना अटक केलेली आहे.पुढील तपास पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

यातील आरोपी नामे बाळा ऊर्फ आकाश मनोहर माकर याचेवर यापुर्वी फरासखाना पोलीस ठाणे येथे अपहरणाचा व हडपसर पोलीस ठाणे येथे मारामारीचे गुन्हे दाखल आहेत. वरील दोन्ही इसम हे रेकॉर्डवरील गुंड राहुल तुपे याचे साथीदार असुन राहुल तुपे हा सध्या नितीन झांबरे याचे खुनाच्या गुन्हयात येरवडा जेल मध्ये आहे.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र शेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.पोलीस उप-आयुक्त परि-२ श्री डॉ.प्रविण मुंढे, सहा.पोलीस आयुक्त श्री डॉ.शिवाजी पवार सो, श्री कमलाकर ताकवले वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व श्री राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस ठाणे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर, भिमराव पुरी, गणेश सुतार, समीर बागसिराज, बाबा नरळे यांचे पथकाने कारवाई केलेली आहे.**